VOL- IX ISSUE- XII DECEMBER 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# बालकामगार प्रथेचे परिणाम : समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा.डॉ.मनोहर तोटरे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालय, मुखेड ता.मुखेड जि.नांदेड

बालकामगार प्रथेमुळे मुलांना त्यांच्या शारीरिक व मानसिक वाढीपासून वंचित राहावे लागत आहे.

प्रस्तुत प्रकरणात बालकामगारांवर आणि त्यांच्या कुटुंबावर झालेले परिणाम, बालकामगारांच्या नोकरी, व्यवसायांचे स्वरुप आणि त्यांना झालेले आजार, तसेच इतर अनिष्ट परिणाम यांची नोंद घेण्यात आली आहे.

**बालकामगारांवर झालेले परिणाम :**

**शारीरिक धोका (Health Hazards):**

बालकामगारांच्या आरोग्याची स्थिती माहित करुन घेण्यासाठी त्यांना झालेले आजार आणि त्यांची कारणे या संबंधी माहिती त्यांच्याकडून घेण्यात आली. उत्तरदात्यांना एकापेक्षा अधिक आजार झाल्याचे आढळून आले आहे. पाठदुखी (२४ टक्के),डोके दुखणे, (१०.३३ टक्के), डोळे दुखणे (३.३३ टक्के), सर्दी, ताप (१०.६६ टक्के), कंबर दुखणे (२७.६६ टक्के), त्वचारोग (३.६६ टक्के), पोट दुखणे (१२.३३ टक्के), श्वसनाचा त्रास (३ टक्के), आणि ५ टक्के व्यष्टींना इतर स्वरुपाचे अनेक आजार झाल्याचे दिसून आले आहे. बालवय हे गतीपूर्ण असते. कोवळया वयातच परिस्थितीच्या रेटयामुळे बालकामगारांना कुटुंबाच्या चरितार्थासाठी श्रम बाजारात सक्तीने श्रम करावे लागतात. याचे अनिष्ट परिणाम उत्तरदात्यावर होत आहेत असे दिसून येते.

**बालकामगारांना झालेले आजार आणि त्यांचे नोकरी व्यवसाय यांच्यातील परस्पर संबंध :**

प्रस्तुत घटकांच्या अनुषंघाने मिमांसा करतांना बालकामगारांना झालेले आजार आणि त्यांच्या नोकरी, व्यवसायातील परस्पर संबंधा बरोबरच आय.व्ही.जार्ज, टि.यागी, एच.खरिहरा, जागोग्लॅड स्टोन,नझिरशाह, एनसॉयक्लोपेडीया ऑफ सोशल सायन्ससेस यांच्या निष्कर्षाचा परामर्श घेतला आहे.

अध्ययनात पाठदुखीचा आजार झाल्याचे सांगणारे बालकामगार पान टपरी, गॅरेज, शिवणकाम, बुक स्टॉल, सुतारकाम, किराणा दुकान आणि घरकाम या नोकरी-व्यवसायांमधील आहेत. ज्या बालकामगारांना रोज अनेक तास काम करावे लागते. त्यापैकी काहींना हे आजार झाल्याचे आढळून आले आहे. अनेक तास एका ठिकाणी बैठया स्वरुपाच्या कामामुळे पाठीच्या मणक्यावर भार पडतो, सांध्यांची हालचाल नसल्यामुळे कमरेचे, गुडघ्याचे, घोटयांचे आणि मनगटांचे सांधे दुखू लागतात असे मत नोंदविले. आय.एल.ओ.च्या निरीक्षणानुसार बालकामगारांची कामाच्या ठिकाणी बसण्याची पध्दत, कोंदट वातावरण, थकवा, यांचा निश्चितच बालकामगारांच्या आरोग्यावर परिणाम होतो.

डोकेदुखी आणि श्वसनाचा त्रास होणे या प्रकारचा आजार झाल्याचे सांगणारे उत्तरदाते बुटपॉलीस, रसवंती, बांधकाम, भंगार संकलन आणि विक्री, किरकोळ विक्री, वाहन सफाई, गुरे राखणे, या व्यवसायांमधील दिसून आले. सतत अनेक तास उन्हा-तान्हात, थंडी -वा-यात त्यांना काम करावे लागत असल्यामुळे त्यांना आजार झालेले आहेत. फिरते व्यवसाय असणा-या बालकामगारांना आरोग्य विघातक पर्यावरणामध्ये वावरावे लागते, शहरातील रस्त्यावरील धूळीचा, रस्त्यावरील घाणीचा, आवाजाचा, वायू प्रदूषणाचा परिणाम त्यांच्या शरीरावर होतो.

डोळयांचे विकार आणि त्वचा विकार या प्रकारचे आजार असणा-या व्यष्टी भंगार-संकलन आणि विक्री या व्यवसायांमधील तर काही व्यष्टी गुरे राखणारे आहेत. भंगार संकलन करणा-यांना दररोज अनेक तास घाणीत काम करावे लागते. गुरे राखणा-या व्यष्टींना दररोज गुरांची घाण काढावी लागते. दूषित वातावरणात ओला-सुका कचरा हाताने उपसावा

लागतो. त्वचा घाणीच्या संपर्कात आल्यामुळे त्वचा विकार झाले आहेत. भंगार गोळा करणा-यांना काही वेळा घाण उपसतांना काचेच्या तुकडयाने किंवा लोखंडी पत्र्यांमुळे इजा झाल्यांचे उत्तरदात्यांनी सांगितले आहे. भंगार संकलनाच्या कामामुळे त्वचारोग होतात असे कुलश्रेष्ठ यांनीही त्यांच्या अभ्यासात नमूद केले आहे.

पोटाचा आजार झाल्याचे सांगणारे उत्तरदाते हॉटेलांमध्ये वेटर म्हणून काम करणरे आहेत. तसेच घरकाम करणा-या काही व्यष्टींचाही यात समावेश आहे. हॉटेल किंवा घरातील शिळेपाके, अन्न खाण्यात आल्याने आणि दुषित पाणी पाल्याने त्यांना हा आजार झाल्याचे दिसून आले. कंबर दुखीचा आजार झाला असे सांगणारे विविध नोकरी,व्यवसायांतील आहेत. विशिष्ट प्रकारच्या नोकरी- व्यवसायातील कामामुळे कंबर दुखीचा आजार झाला आहे असे आढळून आले. सर्दी, ताप हे नैमितिक आजार आहेत. ऋतुमानातील बदल या आजारांचे सर्वसाधारण कारण दिले गेले आहे. हे आजार आणि बालकामगारांचे नोकरी- व्यवसाय यांमध्ये परस्पर संबंध आढळून आला नाही. आय. व्ही. जॉर्ज यांनीही बालकामगारांचे आजार आणि त्यांचे व्यवसाय यात सकारात्मक परस्पर संबंध असतात असे म्हटले आहे. तर टी.यागी यांनी १२ वर्षाच्या कारखान्यात काम करणा-या मुली आणि शाळेत जाण्या-या मुली यांचे वय आणि वजन सारखेच असते. परंतु काम करणा-या मुलींच्या शारीरिक विकासात तिच्या पुढील आयुष्यात निश्चितच परिणाम होतो असे नमूद केले.

एच खरिहरा यांच्या मते, शाळेत जाणा-या मुलांमध्ये १६ वर्षापर्यंत एक मानसिक विकास होतो तर लहानपणापासून कारखान्यात काम करणा-या मुलांचा मानसिक व शारीरिक विकास खुंटतो. जागोग्लँड स्टोन यांनी १९२५ मध्ये न्युयॉर्क मध्ये काम करणा-या २०७६ मुलांचे निरीक्षण केले आहे. त्यापैकी २००० मुलांचे पालन पोषण करण्यात आले. त्यापैकी ६.१८ टक्के मुले ही वजनाने कमी होते. ५४० मुलांना दृष्टीचा आजार होता. ६० मुलांना डोळयाचा विकार होता. ६७ मुलांना कानाचा आजार होता. ४ जणांची ऐकण्याची क्षमता कमी झाली होती. ४५ जणांना दातांचा विकार होता. २००० मुलांपैकी फक्त २२५ मुले सुदृढ होते. ६२० जणांना आजार होता. ६४५ जणांना दोन प्रकारचे आजार होते. ३७४ जणांना तीन प्रकारचे आजार होते. तर १३५ मुलांना चार ते सहा प्रकारचे आजार होते.बाल वयात श्रम केल्यामुळे बालकाच्या शरिरावर अनिष्ट परिणाम होतात असे नझिर शाहा यांच्या अध्ययनात नमूद करण्यात आले आहे. सत्ततच्या श्रमामुळे मुले अनेक रोगांना बळी पडतात असे एनसॉयक्लोपिडीया ऑफ सोशल सायन्ससेस मध्ये नमूद करण्यात आले आहे. वरील संशोधकाच्या निष्कर्षा अनुरुप लातूर तालुका व लातूर शहरातील अध्ययनात बालकामगारांना विविध विकार दिसून आले.

**शैक्षणिक मागासलेपणा** (Eduational Backwardness) :

प्रस्तुत अभ्यासासाठी निवडण्यात आलेल्या एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी ३६.३३ टक्के व्यष्टी निरक्षर आहेत, ४४.३३ टक्के उत्तरदात्यांनी शाळा सोडलेली आहे. तर १९.३३ टक्के व्यष्टी हे अर्धवेळ काम करुन शाळेत जाणारे आहेत.

शाळेत जाण्याच्या वयात कामास जावे लागल्यामुळे शिक्षणास कायमचे मुकावे लागल्याचे शल्य मनाला बोचत असल्याचे ४४.३३ टक्के उत्तरदात्यांनी मत नोंदविले. कनिष्ठ प्रतिच्या, हलक्या कामामुळे प्रतिष्ठा नसलेले काम करावे लागत असल्यामुळे प्रतिष्ठा आणि आत्मसन्मान यांना मुकावे लागल्याचे दु:ख २३.३३ टक्के उत्तरदात्यांनी व्यक्त केले आहे. यामुळे मानसिक ताण-तणाव निर्माण होतात आणि नैराश्य येते. मन व्यथित होते, असे त्यांचे म्हणणे आहे. असाच निष्कर्ष कूलश्रेष्ठ यांच्या अध्ययनात दिसून आला.

**नैतिक अध:पतन (Moral Deterioration):**

बालकामगार ही समस्या नैतिक अध:पतनास जबाबदार आहे. मालकांकडून बालकामगारांना मिळणारी वाईट वागणूक, कंटाळवाणे काम, कमी मजुरी यामुळे बालकामगारांमध्ये मानसिक तणाव निर्माण होतो, परिणामी हा मानसिक ताण घालवण्यासाठी ते व्यसनाचा (सिगारेट ओढणे, पत्ते खेळणे, मद्यपान करणे आदींचा ) आश्रय घेत असल्याचे आढळून आले. बालकामगार बाल वयातच व्यसनाच्या आहारी गेल्यामुळे नैतिकतेचा -हास होतो, असे नजीर शहा यांनी केलेल्या अभ्यासात नमूद केले. मात्र संशोधकाच्या अध्ययनात बालकामगारांचे व्यसनाधीनतेचे प्रमाण कमी दिसून आले. तसेच नैतिक अध:पतन झालेले दिसून आले नाही.

## II.बालकामगार प्रथेचे कुटुंबावर होणारे परिणाम :

प्रस्तुत प्रकरणाच्या या भागात बालकामगार प्रथेचे जे परिणाम कुटुंबावर झाले आहेत. त्यांची मिमांसा करताना कुटुंबातील मिळवित्या मुलां-मुलीकडे पालक कोणत्या

दृष्टिकोनातून पाहतात असा प्रश्न काही उत्तरदात्यांच्या पालकांना विचारण्यात आला आहे.

कुटुंबाचे उत्पन्न आणि खर्च यांची तोंड मिळवणी करणे अशक्य झाल्यामुळे मुला-मुलींना कुटुंबाच्या उत्पन्नाला हातभार लावण्यासाठी काम करावे लागत आहे. मुला-मुलींच्या काम करण्यामुळे आर्थिक लाभ होत असला तरी अंतिमतः मुला-मुलींच्या काम करण्यामुळे मुला-मुलींचे तर नुकसान होतेच परंतु पर्यायाने त्यांच्या कुटुंबाचे नुकसान होते. अशी कुटुंबे सामाजिक-आर्थिक दृष्टया मागासलेली राहतात असे काही पालकांचे म्हणणे दिसून आले. त्याबाबत जाणीव असून सुध्दा जगण्यासाठी नाईलाज म्हणून पाल्यांना श्रमिक म्हणून पाठवितात.

कुटुंबातील पाल्यांच्या काम करण्यामुळे त्यांच्या स्वभावात किंवा बोलण्या- वागण्यात कोणते बदल घडून आले आहेत आणि या बदलांचे कुटुंबावर कोणते परिणाम झाले आहेत. उत्तरदात्यांच्या पालकांना विचारले असता. मिळवती व्यक्ती म्हणून कुटुंबात स्वतःचे स्थान असल्याची भावना मुलांमध्ये निर्माण झाल्यामुळे मुलांच्या वागण्यात उद्दामपणा आला असल्याचे काही पालकांनी नमूद केले.

कांही बालकामगारांच्या पालकानी त्यांची मुले-मुली काही वेळा फारशी बोलत नाहीत, केंव्हा ती चिंताग्रस्त दिसतात तर केव्हा निराश असल्यासारखी वाटतात. त्यामुळे त्यांच्या बद्दल काळजी वाटत असल्याचे आढळून आले.

पालकांच्या व्यसनाधीनतेमुळे पालकांचा कधी कधी रोजगार बुडतो, व्यसनावर पैसा खर्च होत असल्याने घर खर्चासाठी पैसे कमी पडतात, उधारी वाढत जाते, उधार देणारे वसूलीसाठी तगादे लावतात. मुलांच्या पालन-पोषणाकडे पालकांचे दूर्लक्ष होते. या गोष्टीमुळे कुटुंबात नेहमी भांडणे होतात, वस्तुंची आदळआपट होते आणि कुटुंबातील सदस्य सतत तणावाखाली राहतात. यामुळे कौटुंबिक स्वास्थ नष्ट होते, असे ज्या बालकामगारांचे पालक व्यसनाच्या आहारी गेले आहेत त्यांनी स्पष्ट केले आहे.

बालकामगार प्रथेचे प्रौढ कामगारांवर काही अनिष्ट परिणाम होतात असे कुलश्रेष्ठ यांनी त्यांच्या अभ्यासात नमूद केले आहे. त्यांच्या मते बालकामगार प्रथेमुळे प्रौढांना रोजगार मिळण्याच्या संधी नाकारल्या जातात. तसेच प्रौढ कामगारांची देवाण- घेवाण क्षमता कमी होते. तर आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या १९८० मधील अहवालात बालकामगार प्रथेचे बालकामगारांवर आणि त्यांच्या कुटुंबियांवर काही अनिष्ट परिणाम होतात असे नमूद केले आहे. बालकामगार समितीच्या मताप्रमाणे बालवयात श्रम केल्यामुळे मृत्यु दरात वाढ होते.

**बालकामगार प्रथेचे समाजावर होणारे परिणाम :**

बालकामगार प्रथा ही केवळ कुटुंबालाच नव्हे तर संपूर्ण देशालाही आर्थिकदृष्टया नुकसानकारक आहे.

कुटुंबाच्या उत्पन्नाला हातभार लावण्यासाठी मुले बाल वयात श्रम बाजारात श्रम करतांना आढळून येतात.

बालकामगारांचे अल्पवेतना बरोबरच सामाजिक, आर्थिक, मानसिक शोषण केले जाते हे गृहीतकत्ये सिध्द झाले आहे.

**संदर्भ**

१. U.C. Sahoo, Arti, Child Labour Dimensions in India, An Appraisal (Edi,) Tripathy, Child Labour in India, Discovery Publishing House New Delhi, 1995. P. 37.
2. Gerry Rodgers and Guy, standing: The Economic Roles of Children Issues for Analysis in Gerry Rodgers Guy, standing (Eds.),Child Work, Poverty and underd development, ILO, Geneva, 1981, P.10 in Parveen Nangia: Child Labour, Janak Publishers, New Delhi, P.40.
3. Kulshrestha J.C., Child Labour in India, Ashish Publishing House, New Delhi, 1978. P.13.
4. Medhi Irani Datta: The problem of Child Labour and Economic Policies In India (Edi.) Murthy. S. Child Labour in India, RBSA Publlshers, Jaipur, 2001, P.2.
5. Opcit., Kulshrestha, J.C. P.40.
6. Jinesh Chandra Kulshreshtra, Child Labour in India, Ashish Publishing House New Delhi, 1978 P.18.
7. Ministry of Labour, Goverment of India, 1979, Pp. -13.
8. Jane Addan, Child Labour and Panperism, 1903 P.117.
9. Pandey Shridhar, "Child Labour in India, Causes and Cures," (Edi.) Murthy S; Child Labour in India, RBSA Publishers, Jaipur, 2001, P. 100.

10. Nazir Ahmad Shah, Child Labour in India, Anmol Publication, New Delhi, 1992 P.36.
11. बालमजुरी निर्मूलन, यशदा, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन, प्रबोधिनी,पुणे, २००८ पृ. क्र. ०९.